आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१८ मे २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- शांतता, सुरक्षितता आणि आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान करण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं मुंबईतल्या प्रचार सभेत आवाहन / महाविकास आघाडीच्या प्रचार सभेत केंद्र - राज्य सरकारवर टीका

- महाराष्ट्रात इंडीया आघाडीला ४८ पैकी ४६ जागांवर विजय मिळण्याचा इंडीया आघाडीच्या नेत्यांना विश्वास

- लोकसभा निवडणुकीच्या महाराष्ट्रातल्या शेवटच्या टप्प्याच्या प्रचाराची आज सांगता /१३ जागांवर परवा मतदान

- हरियाणात नूह इथं काल रात्री बसला झालेल्या अपघातात ८ जणांचा मृत्यू, तर २४ प्रवासी जखमी

**आणि**

- देशाच्या पूर्व आणि नैऋत्य भागात पुढल्या काही दिवसांत उष्णतेच्या लाटेचा हवामान विभागाचा अंदाज

**<><><><><>**

शांतता, सुरक्षितता आणि आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मतदारांनी मोठ्या संख्येनं मतदान करण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. ते काल मुंबईत महायुतीच्या उमेदवारांसाठी आयोजित प्रचार सभेत बोलत होते. सामान्य माणसाचं जीवन सुकर करणं हे माझं प्राधान्य आहे. मुंबई हे स्वप्नांचं

शहर असल्याचं सांगून मोदी यांनी मुंबईला त्याचे हक्क देण्याचं आश्वासन दिलं. महात्मा गांधींच्या सल्ल्याने स्वातंत्र्यानंतर काँग्रेस विसर्जित झाली असती तर देश ५० वर्षे पुढे गेला असता, असा दावाही मोदी यांनी केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, यांच्यासह मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही उपस्थितींना संबोधित केलं. सभेला येण्यापूर्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना आदरांजली वाहिली. दरम्यान काल मुंबईतच वांद्रे कुर्ला संकुलात महाविकास आघाडीच्या प्रचारसभेत विरोधकांनी सत्ताधऱ्यांवर टीका केली. बाबासाहेबांनी तयार केलेल्या संविधानाला हात लावण्याचा प्रयत्न केला, तर भाजपाचं नामोनिषाण राहणार नाही, असं मत  काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी व्यक्त केलं. मोदीं यांना सत्तेत घालवल्याशिवाय हा आत्मा शांत बसणार नाही, अशी टीका शरद पवार यांनी केली, तर ही सभा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची शेवटची सभा असेल. ४ तारखेला देश डी मोदीनेशन झाल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला. मोदी सरकार पुन्हा आले तर ठाकरे, शरद पवार प्रियंका गांधी सर्व विरोधी नेत्यांना जेलमध्ये टाकले जाईल, अशी भिती केजरीवाल यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

राज्यातल्या ४८ पैकी ४६ जागा इंडीया आघाडीला मिळतील, असा विश्वास काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी व्यक्त केला आहे. ते आज मुंबई  इथं इंडीया आघाडी तर्फे आयोजित वार्ताहर परिषदेत बोलत होते. सध्या निवडणूक जनतेची असून जनता ती लढत असल्याचं खरगे म्हणाले. मोदी देशातला जातीय सलोखा बिघ्रडवत असल्याचा आरोपही त्यांनी केला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

यांच्याकडून चिथावणी दिल्यासारखी वक्तव्य होत आहेत. धर्मांध प्रवृत्ती कशी वाढेल हे सूत्र समोर ठेवून प्रधानमंत्री वक्तव्य करतात. आज सामाजिक ऐक्य हा विषय देशवासीयांसाठी महत्त्वाचा आहे. असं मत राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार यांनी व्यक्त केलं. अयोध्येतलं राम मंदिर अपूर्ण आहे. इंडीया आघाडी सत्तेत आल्यावर हे मंदिर आम्ही पूर्ण करू, असं आश्वासन उद्धव ठाकरे यांनी दिलं.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या राज्यातल्या शेवटच्या टप्प्याच्या प्रचाराची आज सांगता होत आहे. राज्यात उत्तर मुंबई, उत्तर मध्य मुंबई, दक्षिण मुंबई, दक्षिण मध्य मुंबई, वायव्य मुंबई, ईशान्य मुंबई, धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण आणि ठाणे इथल्या १३ जागांवर परवा मतदान होणार आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज हरयाणा इथं दोन सभांना संबोधित करणार आहेत. दुपारी अंबाल इथं आणि संध्याकाळी सोनिपत इथं ते सभेला संबोधित करणार आहेत. या भागात सुरक्षा व्यवस्था चोख ठेवण्यात आली आहे. दिल्लीतही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या प्रचार सभा होणार आहेत. दिल्लीत येत्या २५ तारखेला मतदान होणार आहे.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशात विविध पक्षांचे स्टार प्रचारक आणि ज्येष्ठ नेते आज प्रचाराच्या रिंगणात आहेत. भाजपा नेते राजनाथ सिंह प्रचारसभांना संबोधित करतील. गृहमंत्री अमित शहा अमेठी इथं भाजपा उमेदवार स्मृती इराणी यांच्या प्रचारासाठी रोड शो घेणार आहेत. समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव श्रावस्ती, फैजाबाद,

सुलतानपूर आणि आंबेडकरनगर इथं सभा घेतील. तर काँग्रेस नेते राहुल गांधी बाराबंकी इथं प्रचाराच्या मैदानात असतील. बहुजन समाज पक्षाच्या सर्वेसर्वा मायावती बस्ती इथं सभा घेणार आहेत.

**<><><><><>**

मुंबई उच्च न्यायालयाच्या इमारतीच्या बांधकामासाठी आवश्यक पहिल्या टप्प्यातील जमीन देण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं राज्य सरकारला दिले. प्रकल्पासाठी नियोजित संपूर्ण ९ पूर्णांक ६४ शतांश एकर जमीन हस्तांतरित करण्यासाठी राज्य सरकारला डिसेंबर २०२४ पर्यंत वाट पाहण्याची आवश्यकता नसल्याचं सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती बी. आर. गवई आणि न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला यांच्या खंडपीठानं स्पष्ट केलं. मुंबई बार असोसिएशनच्या अध्यक्षांच्या पत्राची दखल घेत न्यायालयात ही सुनावणी सुरू होती. उच्च न्यायालयाच्या नव्या संकुलासाठी गोरेगाव हे सोयीचे ठिकाण नसल्याची टिप्पणी न्यायालयानं मागील सुनावणीत केली होती.

**<><><><><>**

हरियाणात नूह इथं काल रात्री मथुराहून जालंधरला जाणाऱ्या बसला आग लागल्याने अपघात झाला. त्यात ८ जणांचा मृत्यू झाला तर २४ प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. या पर्यटक बसमध्ये पंजाब आणि हरियाणातील ६० हून अधिक प्रवासी होते. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

**<><><><><>**

मुंबईतल्या घाटकोपर दुर्घटनेतल्या जाहिरात फलकाच्या कंपनीचा मालक भावेश भिंडे याला मुंबई गुन्हे शाखेनं काल मुंबईत आणलं. अधिकाऱ्यांनी दिलेल्या

माहितीनुसार ही दुर्घटना घडल्यानंतर भिंडे फरार होता आणि त्याचा मोबाइलही बंद होता. मुंबई गुन्हे शाखेनं भिंडे याला दोन दिवसांपूर्वी उदयपूरमधून अटक केली. भिंडे हा इगो मीडिया खासगी मर्यादित या कंपनीचा संचालक आहे.

**<><><><><>**

आम आदमी पक्षाच्या आतिशी यांनी आज राज्यसभेच्या खासदार स्वाती मालीवाल यांच्या कथित गैरवर्तणुकीच्या दाव्याचं खंडन केलं आहे. स्वाती मालीवाल यांनी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचे स्वीय सहायक विभव कुमार यांच्या विरोधात गैरवर्तनाचा आरोप करत तक्रार दाखल केली तसचं आम आदमी पक्षाच्या सदस्यांवर चारित्र्यहनन केल्याचा आरोप केला आहे. दरम्यान विभव कुमार यांना आज दिल्ली पोलिसांनी अटक केली.

**<><><><><>**

नेपाळच्या प्रतिनिधीमंडळात येत्या सोमवारी विश्वासदर्शक ठराव मांडण्याची विनंती करणारं पत्र नेपाळचे प्रधानमंत्री पुष्प कमल दहल प्रचंड यांनी संघराज्य संसदीय सचिवांना लिहिलं आहे. नेपाळच्या राज्यघटनेच्या कलम १०० (२) नुसार, युतीच्या सरकारमध्ये एखाद्या पक्षाने दिलेला पाठिंबा काढून घेतल्यास ३० दिवसांच्या आत प्रधानमंत्र्यांनी या प्रतिनिधीमंडळात विश्वासदर्शक ठराव मांडणं गरजेचं आहे. १३ मे रोजी पक्ष फुटल्यानंतर उपेंद्र यादव यांच्या जनता समाजवादी पक्षानं सरकारचा पाठिंबा काढून घेतल्यामुळे प्रचंड यांच्या सरकारला या ठरावाला सामोरं जावं लागत आहे.

**<><><><><>**

देशाचे परराष्ट्र सचिव विनय क्वात्रा यांनी ब्रिटनचे विदेश, प्रजासत्ताक आणि विकास कार्यालयाचे स्थायी सचिव सर फिलीप बार्टन यांची भेट घेतली. क्वात्रा हे १६ आणि १७ मे रोजी ब्रिटनच्या दोन दिवसीय दौऱ्यावर होते त्यादरम्यान त्यांनी ही भेट घेतली. उभयतांमध्ये द्विपक्षीय संबंध, क्षेत्रीय आणि जागतिक विषयांवर चर्चा झाली. या भेटीत २०३० पर्यंतच्या कार्ययोजनांचा आढावाही घेण्यात आला.

**<><><><><>**

भविष्यातल्या रोजगाराच्या संधींसाठी विद्यार्थ्यांना तयार करण्याच्या दृष्टीने आंतरविद्याशाखीय शिक्षण अत्यावश्यक असल्याचं प्रतिपादन दुबई इथं झालेल्या गल्फ न्यूज एज्युफेअर या कार्यक्रमात शिक्षण क्षेत्रातल्या अग्रणींनी केलं. मणिपाल विद्यापीठ आणि मिडलसेक्स विद्यापीठाच्या प्रतिनिधींनी त्यांच्या संस्थांमध्ये यावर सुरू असलेल्या कामाबद्दल माहिती दिली.

**<><><><><>**

भारतीय तंत्रज्ञान संस्था दिल्लीच्या अबुधाबी संकुलात यंदा प्रथमच पदवीपूर्व अभ्यासक्रम सुरू होत आहेत. २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेची मार्गदर्शक तत्वे जारी करण्यात आली आहेत. या संस्थेत संयुक्त प्रवेश परीक्षा सीएईटी २०२४ किंवा संयुक्त प्रवेश परीक्षा जेईई २०२४ च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येईल.

**<><><><><>**

देशाच्या पूर्व आणि नैऋत्य भागात पुढल्या काही दिवसांत उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. राजस्थान, पंजाब, हरयाणा आणि दिल्लीत मंगळवारपर्यंत मोठ्या प्रमाणात उष्णता असेल. तर गुजरातमध्येही

उष्णतेचा पारा वाढला आहे. इथल्या सुरेंद्रनगरमध्ये काल ४४ पूर्णांक ७ अंश सेल्सिअस तर अहमदाबादमध्ये ४४ पूर्णांक २ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आल्याचं हवामान विभागानं सांगितलं.

**<><><><><>**

केरळमध्ये पुढल्या काही दिवसांत जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. पल्लकड आणि मलप्पुरम जिल्ह्यात  ऑरेंज अलर्ट तर तिरुवनंतपुरम, कोल्लम, पतनमतित्ता, अलपुझ्झा, इडुकी, कोझीकोड आणि वायनाड जिल्ह्यात यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. वादळी वाऱ्याची शक्यता असल्यानं मच्छीमारांना समुद्रात न जाण्याचं आवाहन केलं गेलं आहे. तर केरळच्या डोंगराळ भागांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा सामना चैन्नई सुपर किंग्स बरोबर संध्याकाळी साडेसात वाजता बंगळुरुच्या चिन्नास्वामी स्टेडिअमवर होणार आहे.

**//<><><><><>//**